जा.क्र. 1632/2020

धर्मादाय आयुक्त कार्यालय,
मुंबई.
मालमत्ता शाखा
दिनांक:- १९/०६/२०२०

# परिपत्रक क्र ५७९

**विषय:- कार्यालयासाठी जागा भाड्याने घेणे अगर भाडेकरार नूतनीकरणासाठीचे प्रस्ताव.**

धर्मादाय संघटनेतील काही कार्यालय ही जागा भाडेतत्त्वावर घेऊन सुरू आहेत. सदर इमारत भाडेतत्त्वावर घेतेवेळी अगर भाडेकरार नूतनीकरण करतेवेळी वेळेत प्रस्ताव सादर न केल्यामुळे तसेच भाडेरक्कम वेळेत अदा न झाल्याने धर्मादाय संस्थेतील कार्यालयांना अनेक तक्रारींना सामोरे जावे लागते. तसेच वित्तीय नियम पुस्तिकेतील नियमांचे अवलोकन न करता क्षेत्रीय कार्यालयांकडून जागा भाड्याने घेणेबाबत अगर भाडेकरार नूतनीकरणयाबाबतचे प्रस्ताव या कार्यालयात पाठवतात . त्यामुळे जागा भाड्याने घेतेवेळी व प्रस्ताव या कार्यालयाकडे पाठविताना खालील नियमांचे काटेकोर पालन करावे.

१. वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ व वित्त विभागाचा ,शासन निर्णय क्रमांक विअप्र- २०१३/ प्र.क्र.३०/ २०१३ विनियम, भाग २ मधील अनुक्रमांक १० नुसार कार्यालयासाठी जागा भाड्याने घेण्यास व भाडे प्रदान करण्यास मंजुरी देणेबाबत नियम नमूद केलेले आहेत. या नियमानुसार तसेच शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार जागा भाड्याने घेण्याचे प्रस्ताव अगर भाडेकरार नूतनीकरणाचे प्रस्ताव पाठवणे आवश्यक आहे.

२. जागा भाड्याने घेतेवेळी वर नमूद शासननिर्णयातील नियमांना अधीन राहून-

i) कार्यालय प्रमुख यांनी सदरची जागा कार्यालयासाठी सोईस्कर असलेबाबतचा अहवाल सादर करण्यात यावा.

ii)संबंधित कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून शासकीय जागा उपलब्ध नसल्याबाबतचे प्रमाणपत्र घेण्यात यावे

iii)संबंधित कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून जागेचे वाजवी भाडे प्रमाणपत्र घेण्यात यावे.

iv) जागेचे कायदेशीर कागदपत्रे व जागा मालकाचे संमतीपत्र घेण्यात यावे.

v) जागा भाडे तत्वावर घेण्याचा प्रस्ताव वरील सर्व कागदपत्रांसह वरील शासन निर्णयात नमूद केले प्रमाणे अधिकाराचा वापर करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी यांचेकडे तात्काळ सादर करण्यात यावा.

vi) 'भाडे, दर आणि कर' या लेखाशिर्षखाली आवश्यक निधी उपलब्ध असलेबाबत खात्री करण्यात यावी अगर नवीन लेखाशिर्ष काढण्याची कार्यवाही करण्यात यावी.

३. भाडे करार नूतनीकरणाचे प्रस्ताव सादर करतेवेळी वर नमूद शासननिर्णयात नमूद अटींना अधीन राहून-

i) भाडे करार संपुष्टात येणे पूर्वी तीन महिन्याचे आत कागदपत्रांसह अधिकारांचा वापर करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकारी यांचेकडे भाडे करारनूतनीकरणाचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

ii) सदर प्रस्तावासोबत जुन्या करारनाम्याची प्रत देण्यात यावी.

iii) संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासकीय जागा उपलब्ध नसल्याबाबतचे नवीन(प्रस्ताव पाठविताना) प्रमाणपत्र जोडावे.

iv) संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रस्तावित जागेचे नवीन (प्रस्ताव पाठविताना) वाजवी भाडे प्रमाणपत्र जोडावे.

v) जागा मालकाचे नवीन (प्रस्ताव पाठविताना) संमतीपत्र जोडावे.

vi) 'भाडे, दर आणि कर' या लेखाशिर्ष खाली आवश्यक निधी उपलब्ध असलेबाबत खात्री करण्यात यावी .

जागा भाडे तत्त्वावर तसेच भाडेकरार नूतनीकरणासाठी वरील नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. अन्यथा विलंबास जबाबदार कर्मचारी/अधिकारी यांचेवर उचित कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच शासनाने वेळोवेळी यासंबंधी दिलेल्या निर्देशांचे पालन करण्यात यावे.

रा.न.जोशी
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.